### सुधारित अंदाज २००४-०५

मे २००४ मध्ये सन २००४-०५ चा अर्थसंकल्प सादर करताना रु. ७३०३.३५ कोटींची तूट राहील असा अंदाज व्यक्त केला होता. सुधारित अंदाजात रु २९८.८४ कोटींची तूट दिसते. वर्षारंभाची रु. ३१६.९३ कोटींची प्रत्यक्ष उणे शिल्लक हिशेबात घेतल्यास वर्ष अखेरची रु. ६१५.७७ कोटी इतकी तूट होईल.

### अर्थसंकल्पीय अंदाज २००५-०६

सन २००२-२००३ च्या अर्थसंकल्पामध्ये पुढे दर्शविल्याप्रमाणे रु. ३४४.९५ कोटी तूट राहील असा अंदाज आहे :----

(रुपये कोटीत)

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) महसुली विभाग— | | | |
| जमा | .. | .. | ५०,४२९.८२ |
| खर्च | .. | .. | ५०,१६३.९६ |
| | शिल्लक | .. | २६५.८६ |
| (ब) भांडवली विभाग— | | | |
| जमा | .. | .. | १०,९१९.०१ |
| खर्च | .. | .. | १२,६२०.३५ |
| | तूट | .. | १,७०१.३४ |
| (क) लोकलेखा (निव्वळ) | .. | .. | ४,६७४.७७ |
| (ड) जमा (अ + ब + क) | .. | .. | ६६,०२३.६० |
| खर्च (अ + ब) आणि अर्थसंकल्पात समाविष्ट न झालेला रु. २५८३.३६ कोटींचा योजनांतर्गत नियतव्यय | .. | .. | ६२,७८४.३१ |
| | शिल्लक | .. | ६५५.९३ |
| | सुरूवातीची शिल्लक | .. | (-) ६१५.७७ |
| | एकूण शिल्लक | .. | ४०.१६ |

वार्षिक योजना सन २००५-२००६ बाबत योजना आयोगाशी झालेल्या चर्चेच्या आधारे या वर्षाच्या योजनेचे आकारमान रु.११,००० कोटी निश्चित करण्यात आले आहे. रु.११,००० कोटी नियतव्ययापैकी रु. ८,४१६.६४ कोटी इतका नियतव्यय अर्थसंकल्पित झाला असून उर्वरित रु. २,५८३.३६ कोटी इतक्या योजनांर्तगत नियतव्ययाची आवश्यक ती साधनसंपत्ती अर्थसंकल्पात उपलब्ध असल्याने हा नियतव्यय वर्षभरात अर्थसंकल्पित करण्यात येईल.

### मूल्यवर्धित करप्रणालीची अंमलबजावणी

भारतातील राज्यांनी सध्याच्या विक्रीकर प्रणालीऐवजी मूल्यवर्धित करप्रणाली अंमलात आणण्याचा निर्णय २००३ मध्ये घेतला होता. तथापि, त्यावेळच्या विशिष्ट परिस्थितीमुळे मूल्यवर्धित करप्रणालीची अंमलबजावणी लांबणीवर टाकावी लागली, हे सन्माननीय सदस्यांना माहितच आहे. असे असले तरी मूल्यवर्धित कर प्रणाली अंमलात आणण्याचे लक्ष्य कायम होते. राज्यांच्या वित्तमंत्र्यांच्या शक्तीप्रदत्त समितीने या विषयावर सातत्याने बैठका घेतल्या व राज्याराज्यांमधील मतभेदाचे मुद्दे सोडविण्याचे प्रयत्न चालू ठेवले. मागील सार्वत्रिक निवडणूकांनंतर केंद्र सरकारने

मुल्यवर्धीत कर प्रणालीची अंमलबजावणी करण्याच्या राज्यांच्या प्रयत्नांना पुन्हा पाठिंबा देण्याचे जाहिर केले आहे. आता मुल्यवर्धित प्रणालीची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २००५ पासून करण्याचे निश्चित झाले आहे.

## भारतीय अर्थव्यवस्था आणि मूल्यवर्धित कर

भारतीय अर्थव्यवस्थेने विकासाचा उच्च दर सातत्याने राखलेला आहे. हा उच्च दर खऱ्या अर्थाने कायम राखण्यासाठी विकासाच्या मार्गावरील दृष्टीक्षेपात येणाऱ्या अडचणी दूर करण्याची जरूरी आहे. अप्रत्यक्ष करांचे उच्च दर ही त्यापैकी एक अडचण आहे. सामाईक राष्ट्रीय बाजारपेठ नसणे ही दुसरी अडचण आहे. या शिवाय, कराच्या दरांमधील असमानता आणि कर वसूलीची अकार्यक्षम व्यवस्था या सारख्या इतर मोठ्या अडचणी आहेत. विद्यमान विक्रीकर पध्दतीऐवजी मुल्यवर्धीत कर पध्दतीमुळे भारतीय अर्थव्यवस्था अशाप्रकारच्या अडचणी दूर करु शकेल हे आता सर्वमान्य झालेले आहे. परिणामतः राज्याची अर्थव्यवस्था व आर्थिक प्रशासन भक्कम पायावर उभी राहील.

## मूल्यवर्धित कराची पार्श्वभूमी

मुल्यवर्धीत कर प्रणालीची पूर्वतयारी म्हणून राज्य शासनाने उद्योगांच्या विकासासाठी विक्रीकर आधारित प्रोत्साहने देण्याची योजना जानेवारी २००० पासून बंद केली आहे. राज्यांनी २०० पेक्षा अधिक महत्वांच्या वस्तूंवर एक समान न्यूनतम दराचा विक्रीकर लागू केला आहे. राज्य विधानमंडळाच्या दोनही सभागृहांनी मार्च २००३ मध्ये पारित केलेल्या महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर विधेयकाला आता माननीय राष्ट्रपतींची मान्यता सुध्दा प्राप्त झाली आहे.

तदनुसार दिनांक १ एप्रिल, २००५ पासून राज्यात मूल्यवर्धित कर प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी आमची तयारी
झाली आहे.

## निरनिराळया अधिनियमांचे एकर्तिकरण

कार्यपध्दती अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने निरनिराळे विक्रीकर विषयक कायदे रद्द करुन, त्याऐवजी नवीन मुल्यवर्धित कर अधिनियम अंमलात आणला जाईल. अशाप्रकारे विद्यमान मुंबई विक्रीकर अधिनियम, कार्यकंत्राट कर अधिनियम, लिजकर अधिनियम आणि मोटार स्पिरीट कर अधिनियम रद्द करण्यात येऊन त्याऐवजी महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अंमलात आणला जाईल. तथापि, ऊस खरेदीकर अधिनियम मात्र कायम राहील.

## कर दरात सुसूत्रता

नवीन कर पध्दतीनुसार नोंदणी करण्यासाठी पुनर्विक्रेते अणि उत्पादक यांची उलाढाल मर्यादा रुपये ५ लाख राहील तसेच आयातदारांसाठी सदर मर्यादा रुपये १ लाख एवढी असेल. निरनिराळ्या वस्तूंसाठी करांचे दर राष्ट्रीय पातळीवर झ ालेल्या मतैक्यानुसार असतील. साखर, तंबाखू व कापड यावर केंद्र शासनातर्फे विक्रीकराऐवजी अतिरिक्त उत्पादन शुल्काची आकारणी होते. म्हणून या वस्तू मुल्यवर्धित कराच्या बाहेर राहतील. तसेच, अन्नधान्ये व कडधान्ये यावर वर्धितमुल्य कराची माफी सध्या चालू राहील. महत्वाचा औद्योगिक कच्चा माल आणि दैनंदिन वापराच्या काही वस्तू यावर ४ टक्के कर लागू होईल. मौल्यवान धातू, मौल्यवान आणि निम मौल्यवान खडे, मोती आणि त्यांचे दागदागिने यांच्यावर १ टक्का कर लागू राहिल. मद्य आणि मोटार स्पिरीट यावरील सध्याच्या विक्रीकर दरात कोणताही बदल होणार नाही. इतर सर्व वस्तूंवर १२.५ टक्के या एकाच प्रमाणित दराने कर लागू होईल. सध्या अधिकतर वस्तुंवर विक्रीकराचा प्रभावी दर १७.५ टक्के आहे. नवीन प्रमाणित दर त्या तुलनेत कमी असल्याने मुल्यवर्धित कर प्रणालीत सर्वसाधारणपणे कराचा बोजा प्रत्यक्षात कमी होईल.

## खरेदीवरील कराची वजावट

खरेदीवर भरलेल्या कराची संपूर्ण वजावट मिळणे हे मूल्यवर्धित कराचे सार्वत्रिक वैशिष्ट्य आहे. फारच थोड्या व्यवहारांच्या बाबतीत खरेदीवर भरलेल्या एकूण करापैकी काही रकमेची वजावट मिळणार नाही. परिणामतः करमुक्त वस्तूंच्या उत्पादनात आणि कन्साईनमेंटद्वारे इतरत्र पाठविलेल्या वस्तूंच्या बाबतीत ४ टक्के रकमेपेक्षा अधिक भरलेल्या खरेदीकराचीच वजावट प्राप्त होईल. प्रवासी वाहने, कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात आलेले पेट्रोल आणि डिझेल आणि पेट्रोलियम शुध्दीकरण कारखान्यांनी वापरलेले खनिज तेल यांच्या बाबतीत खरेदीकराची वजावट मिळणार नाही. तथापि, दिनांक ३१ मार्च, २००५ रोजीच्या व्यवहार अंती फेरविक्रेत्यांकडे शिल्लक असलेल्या मालाच्या बाबतीत मात्र खरेदीकराची संपूर्ण वजावट मिळणार आहे. अशाप्रकारे खरेदीवर भरलेल्या कराची वजावट मुल्यवर्धित कर अंमलात आणल्यानंतर लगेचच घेता येईल.

### मूल्यवर्धित कर प्रणालीचे प्रशासन

मूल्यवर्धित कर प्रणालीनुसार वार्षिक कर निर्धारणेऐवजी विवरण पत्रांची छाननी आणि व्यवसायाचे लेखा परिक्षण ही पध्दती अंमलात आणली जाईल. यासाठी विक्रीकर विभागाला प्रशिक्षण देवून नवीन कर प्रणालीच्या गरजांनुसार त्या विभागाची पुनर्रचना करण्यात येईल. नवीन पध्दतीमध्ये व्यापाऱ्यांनी भरलेली विवरणपत्रे मुख्यतः ग्राह्य धरली जातील. अपवादात्मक परिस्थितीत निर्धारणा केली जाईल. कामाच्या पध्दतीत हा एक महत्वपूर्ण गुणात्मक फरक आहे.

### सामूहिक प्रोत्साहन योजना

ज्या औद्योगिक घटकांना जानेवारी २००० पूर्वी विक्रीकरावर आधारित प्रोत्साहन योजनेचा लाभ देण्यात आलेला होता त्यांना तसा लाभ या पुढेही मिळत राहील. तथापि, नवीन कर प्रणालीनुसार कच्च्या मालाच्या करमुक्त खरेदी ऐवजी कच्चा माल खरेदीवर प्रत्यक्ष भरणा केलेल्या कराचा परतावा देण्याची पध्दत लागू होईल. मूल्यवर्धित कर प्रणालीमध्ये सध्या सामुहिक प्रोत्साहन योजनेतील पात्र औद्योगिक घटकांना विक्रीसाठी असलेली करमाफीची योजना तसेच कर विलंबनाची योजना या पुढेही चालू राहतील. तथापि, जेव्हा करमाफीखालील घटकाने उत्पादित केलेल्या मालाची फेरविक्री होईल तेव्हा त्या वस्तुच्या फक्त फेर विक्रीतील वाढीव मूल्यावर कर गोळा करण्यात येईल. करमुक्त योजनेखालील घटकाच्या मूळ विक्री किंमतीवर कोणताही कर आकारला जाणार नाही.

### आपसमेळ योजना

विशिष्ट प्रकारच्या व्यापाऱ्यांना त्यांच्या व्यवसायाचे स्वरुप लक्षात घेऊन कागदपत्रांच्या व्यापातून सवलत देणे आवश्यक आहे. तदनुसार असंख्य ग्राहकांशी व्यवहार करणाऱ्या किरकोळ व्यापाऱ्यांसाठी एक नवीन आपसमेळ योजना अंमलात आणली जाईल. अशा किरकोळ व्यापाऱ्यांना त्यांची खरेदी किंमत आणि विक्री किंमत या मधील फरकाच्या रकमेवर एकाच दराने कर भरावा लागेल. तसेच त्यांना सहामाही विवरणपत्रे दाखल करावी लागतील. त्यांना त्यांच्या विक्रीवर स्वतंत्रपणे कर गोळा करावा लागणार नाही अथवा त्यांच्या खरेदीवरील कराची वजावट सुध्दा मागावी लागणार नाही. अशाच प्रकारच्या सुलभ आपसमेळ योजना उपहारगृहे, बेकरीज व कार्यकंत्राटदारांनाही लागू केल्या जातील.

### मूल्यवर्धीत कर प्रणाली खालील महसूल

मूल्यवर्धीत कर प्रणाली लागू केल्यामुळे राज्य शासनास होणाऱ्या कोणत्याही महसूली तोट्याची भरपाई देण्याचे केंद्र सरकारने मान्य केले आहे. सदर भरपाई मूल्यवर्धीत कर आकारणीच्या पहिल्या वर्षी महसूल तुटीच्या १०० टक्के, दुसऱ्या वर्षी ७५ टक्के आणि तिसऱ्या वर्षी ५० टक्के या प्रमाणात दिली जाणार आहे. दरम्यानच्या काळात, राज्य शासनांना साखर, तंबाखू आणि कापड यावर कर आकारणी करण्याचा वैधानिक अधिकार प्राप्त होणार आहे. राज्यांनी सेवा क्षेत्रावर कर लागू करण्याच्या प्रस्तावावर सध्या चर्चा चालू आहे. राज्यात परदेशातून आयात होणाऱ्या वस्तूंवर सुध्दा मूल्यवर्धित कर लागू करावा आणि त्याचा लाभ सर्वस्वी राज्य शासनांना मिळावा अशी विनंती केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे. अशाप्रकारे मूल्यवर्धित कर प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे राज्याला होणारा महसूलाचा तोटा

वर नमूद केलेल्या उपाययोजनांमुळे भरुन निघेल, अशी अपेक्षा आहे. मी येथे नमुद करू इच्छितो की मुल्यवर्धित कर प्रणालीच्या पहिल्या वर्षी केंद्रीय विक्रीकर वसूल करण्यासाठी अंमलात असणाऱ्या पध्दतीमध्ये कोणताही बदल होणार नाही.

**विद्यमान अधिनियमांतील सुधारणा**

मूल्यवर्धित कर अधिनियमामुळे रद्द कराव्या लागणाऱ्या निरनिराळ्या कर कायद्यांमध्ये काही सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. तद्नुसार, मुंबई विक्रीकर अधिनियमानुसार कर निर्धारणा पूर्ण करण्यासाठी अनुज्ञेय असणारी समय मर्यादा दिनांक ३१ मार्च २००५ पर्यंतच्या कालावधींसाठी पाच वर्षांपर्यंत वाढविण्याचे प्रस्तावित केले आहे. कायद्यातील इतर तरतूदींशी सुसंगत ठरण्याच्या दृष्टीने पुनर्विलोकनाच्या तरतूदीमध्ये एक छोटीसी दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित केले आहे. भाडेपट्टा कर अधिनियम, मोटर वाहनांचा प्रवेश कर अधिनियम, आणि कार्यकंत्राट कर अधिनियम या कायद्यांमध्ये काही तांत्रिक स्वरुपाच्या दुरुस्त्या करण्याचे प्रस्तावित केले आहे. महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रातील मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२ ची एक तरतूद एका प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने अवैध ठरविलेली होती. त्या प्रकरणातील अपिलामधील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पूर्वीची स्थिती पुन:स्थापित करणे आवश्यक असल्याने त्यासाठी सुधारणा प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**मूल्यवर्धीत कर अधिनियमांतील सुधारणा**

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर विधेयकाला मार्च २००३ मध्ये राज्य विधानमंडळाची मान्यता प्राप्त झालेली आहे. तदनंतर विविध राज्यांच्या मूल्यवर्धित कर विधेयकांवर केंद्र शासनाने काही अभिप्राय व्यक्त केलेले आहेत. तसेच राज्यांच्या वित्त मंत्र्यांच्या शक्तीप्रदत्त समितीकडून मूल्यवर्धित कर प्रणाली अंमलात आणण्याच्या संदर्भातील मुद्यांचे पुनरावलोकन केले जात आहे. या व्यतिरिक्त, निरनिराळ्या व्यापारी संघटना, कर व्यावसायीक आणि राज्य शासनाने नियुक्त केलेले तांत्रिक सल्लागार सारख्या विविध स्त्रोतांमधून सूचना आणि आक्षेप सुध्दा प्राप्त झालेले आहेत. अशा सर्व प्राप्त शिफारशींना विचारात घेऊन महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठी एक सर्वकष प्रारुप सुधारणा विधेयक प्रस्तावित करण्यात आले आहे.

**सल्लागार समिती**

मुल्य वर्धित कर ही केवळ महसूल गोळा करण्याची एक नवीन पध्दत नसून यामध्ये कर प्रशासन वेगळया पध्दतीने चालविणे देखील अंतर्भूत आहे. नवीन पध्दतीच्या पहिल्या काही महिन्यात साहजिकच व्यापारांना वेगळया कार्यपध्दतीची ओळख करून घेऊन मग तिचा अवलंब करावा लागेल. म्हणून सदर प्रशासनाच्या ओघात वेळोवेळी ज्या समस्या उद्‌भवतील त्यांचे लगेच व योग्य निराकारण होणे अगत्याचे आहे. या दृष्टीने उद्योग व व्यापार यांच्या प्रतिनिधींची एक सल्लागार समिती नेमण्याचे मी ठरविले आहे. ही समिती वेगवेगळया प्रशासकीय प्रश्नांवर विचार करेल व शासनाला आवश्यक तो सल्ला देईल.

**सिनेमाचा कॉपीराईट्स**

व्हिडीओ चित्रपटांसहित चित्रपटांच्या कॉपीराईट्सच्या लीज व विक्री यावर लीज कर अधिनियम आणि मुंबई विक्रीकर अधिनियम याखाली कर लागतो. चित्रपट आणि व्हिडीओ चित्रपटांचा व्यवसाय हा मुंबई आणि महाराष्ट्राच्या इतर ठिकाणी भरभराटीस येत असलेला उद्योग आहे, ही वस्तुस्थिती विचारात घेऊन वरील कॉपीराईटस्‌च्या संदर्भात दिनांक १ मे, २००० पासून योग्य ते प्रशासकीय सहाय्य मंजूर करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**बल्क ड्रग**

शेजारच्या काही राज्यांमध्ये बल्क ड्रगच्या आंतरराज्य विक्रीवर २ टक्के दराने कराची आकारणी होते. यामुळे शासनाच्या महसुलावर विपरीत परिणाम होतो. महसूल हानी टाळण्यासाठी महाराष्ट्रातून होणाऱ्या अशा आंतरराज्य विक्रीवर देखील २ टक्के दरानेच कराची आकारणी करावी असे मी प्रस्तावित करतो.

**स्थावर मालमत्तेच्या व्यवहारांवरील मुद्‌रांक शुल्क**

सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात शासनाने स्थावर मालमत्ता संबंधित व्यवहारांवर कमाल मुद्रांक शुल्क १० टक्क्यावरुन ५ टक्क्यापर्यत कमी करण्याचा निर्णय घेतला होता. मला सांगावयास आनंद होतो की, मुद्रांक शुल्क कमी केल्यामुळे व्यवहार नोंदणीकृत करण्याच्या प्रक्रियेत लक्षणीय वाढ झाली असून मुद्रांक शुल्क वसूलीवर सुध्दा चांगला परिणाम झाला आहे. सन २००४-०५ या वर्षात मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी ची वसूली सुमारे रुपये ४,००० कोटी इतकी होणार असून सदर वसूली सन २००३-०४ पेक्षा सुमारे २० टक्क्याने वाढणार आहे. मुद्रांक शुल्काचा दर जनतेला परवडण्याजोगा व्हावा आणि इतर प्रकारचे दस्तऐवज आणि व्यवहार नोंदणीकृत करुन घेण्यास लोकांना प्रवृत्त करावे या दृष्टीने इतर व्यवहारांवरील मुद्रांक शुल्कांचे दर कमी करण्यावर शासन कटीबध्द आहे.

**प्रधान मुद्रांक कार्यालय,**

सर्व प्रकारच्या अभिनिर्णय प्रकरणातील विलंब टाळण्यासाठी आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई या कार्यालयाची पुर्नरचना शासन करेल. तसेच रोखे बाजार आणि वस्तू बाजारासह भांडवली बाजारातून मुद्रांक शुल्क वसुलीवर विशेष लक्ष केंद्रीत केले जाईल. भाडवली बाजार व स्थावर मालमत्ता यांचे संदर्भात मुद्रांक शुल्क वसुलीवर नियमित लक्ष ठेवण्यासाठी मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखालील दोन विशेष पथके स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे.

मुद्रांकाची विक्री, पुरवठा व छाननी संगणकीय प्रणालीद्वारे करण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे. तसेच यामुळे मुद्रांकांच्या वारंवार तुटवड्याची परिस्थिती उद्‌भवणार नाही. तसेच बनावट मुद्रांकाचा वापर करणे आणि दस्तऐवजांमध्ये हातचलाखी करणे या सारख्या गैरप्रकारांची शक्यता कमी होईल. शासन त्यासाठी संगणक आधारित नेटवर्कद्वारे संगणकीकृत मुद्रांक शुल्क प्रशासन प्रणाली (C-SAS) स्थापन करेल. त्याद्वारे नामनिर्देशित बँका आणि वित्तीय संस्थांना स्टॅम्प विक्रीसाठी प्राधिकृत करण्यात येतील आणि सदर बँका आणि वित्तीय संस्था सर्व प्रकारच्या व्यवहारांवरील मुद्रांक शुल्काबाबतची माहिती मुद्रांक आणि नोंदणी अधिकाऱ्यांना सातत्याने देतील.

**गृह कर्जावरील मुद्रांक शुल्क**

सामान्य माणसाला मालकी हक्काचे घर खरेदी करण्यास प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने रुपये १ लाख रकमेपर्यंतच्या गृह कर्जावरील मुद्रांक शुल्क शासनाकडून माफ करण्यात येईल. तसेच रुपये १० लाख रकमेपर्यंतच्या गृह कर्जावरील मुद्रांक शुल्क ५० टक्क्यांनी कमी करण्यात येईल.

**शैक्षणिक कर्जावरील मुद्रांक शुल्क**

शिक्षणाचा वाढता खर्च विचारात घेता, विद्यार्थ्यांना या ना त्या मार्गाने कर्ज घेणे भाग पडते. म्हणून विद्यार्थ्यांना अशाप्रकारची शैक्षणिक कर्जे घेणे शक्य व्हावे म्हणून देशामधील विविध अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शैक्षणिक कर्जासंबंधीच्या दस्तऐवजांवरील/ संलेखांवरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**मुल्यवर्धित कर आधारित मुद्रांक शुल्क पध्दत**

विकास करारनामे आणि मालमत्ता विकास संबधित अभिहस्तांतरण अशा दोन टप्प्यासाठी मुल्यवर्धित कर आधारित मुद्रांक शुल्क पध्दत लागू करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. यामुळे गुंतवणूकदारांचे हितसंबंध सुरक्षित राहण्यास मदत होईल आणि स्थावर मालमत्तेच्या खरेदीदारांना त्यांच्या व्यवहाराशी संबंधित सर्व दस्तऐवज नोंदणीकृत करुन घेण्यास प्रोत्साहन मिळेल.

### वस्तूबाजारातील व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क

शासन भांडवली बाजारातील गुंतवणूक व उलाढालीमध्ये वाढ घडवून आणून, भांडवली बाजार अधिक सशक्त व स्थिर करण्याचा विचार करीत आहे. मुंबई हे देशातील वित्तीय व भांडवली बाजाराचे मध्यवर्ती केंद्र आहे आणि देशातील हे स्थान अबाधित राखण्यासाठी आम्ही बांधील आहोत. बाजारात उत्साहवर्धक स्थिती निर्माण करण्यासाठी सौदेबाजार व वायदेबाजारातील व्यवहारांवरील मुद्रांक शुल्कात कपात करुन, सुसूत्रता आणण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. यानुसार शासनाने वस्तू बाजारामधील व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क ९० टक्यांनी तर शासकीय प्रतिभूतींचे खरेदी-विक्रीवरील मुद्रांक शुल्क ९५ टक्यांनी कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. वेगाने बदलणाऱ्या बाजारपेठीय संकल्पनांबरोबर जुळवून घेण्याची आवश्यकता आहे याची शासनास जाणीव आहे. म्हणून बाजारपेठेतील विद्यमान व्यवहार दृष्टीसमोर ठेऊन, बाजारपेठ व्यवहार विषयक तरतूदींची पुनर्रचना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

### रोखे बाजाराशी समन्वय

सध्या रोखे बाजार अथवा वस्तू बाजारपेठेतील देय मुद्रांक शुल्क संबंधित दलाल अथवा गुंतवणूकदारांकडून वसूल करण्यात येते. याच्या परिणामी व्यापारी वर्गाची गैरसोय होत असून मुद्रांक शुल्काची अपेक्षित वसूली होत नाही. म्हणून संबंधित कार्यपध्दती सुलभ करण्यासाठी आणि मुद्रांक शुल्काची वसूली अधिक सहजपणे आणि कार्यक्षमतेने होण्यासाठी संबंधित बाजारपेठा आणि व्यापारी समुह यांच्या समवेत व्यवस्था करुन घेण्याचा शासनाचा मनोदय आहे.

### मुद्रांक शुल्क विषयक प्रस्ताव

संबंधित पक्षकारांचे कायदेशिर हक्क सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने काही प्रकारचे दस्तऐवज मुद्रांक शुल्क अधिनियमाच्या कक्षेमध्ये आणण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. तदनुसार शासनाने जाहिराती, प्रसारण इत्यादीशी संबंधित करार, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कक्षेत आणण्याचा निर्णय घेतला आहे.

लिव्ह ॲंड लायसेन्स करारनामे, गहाणखते आणि तारणगहाण यांची नोंदणी बँकामार्फत करण्याचा प्रयत्न शासन करणार आहे.

मृत्यूपत्रप्रमाण आणि लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ वील यावरील कोर्ट फी ७.५ टक्क्यावरुन ५ टक्केपर्यंत कमी करुन, कोर्ट फी ची संरचना सुलभ करण्याचे शासनाने प्रस्तावित केले आहे.

व्यापारी व्यवहारांची नोंदणी करण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सर्व प्रकारच्या गहाणखतांवरील मुद्रांक शुल्क १ टक्क्यावरुन ०.५ टक्के पर्यंत कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

### ट्रॅक्टर ट्रेलर्सवरील कर

मागील अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांना मदत करण्याच्या उद्देशाने शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या मोटर ट्रेलर्सवरील कर माफ करण्याचे मी जाहिर केले होते. तथापि मुळ कर रकमेवरील देय व्याजाची संचित रक्कम रुपये १९.६६ कोटी एवढी आहे. या संदर्भात शेतकरी वर्गाकडून प्राप्त झालेल्या निवेदनास प्रतिसाद देण्याच्या दृष्टीने मी एक अभय योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर योजनेनुसार प्रलंबित कराची थकबाकी ३० जून, २००५ पर्यंत पूर्णपणे भरल्यास तत्संबंधीच्या देय व्याजाची रक्कम संपूर्णपणे माफ करण्यात येईल.

### समारोप

माझ्या मागील अर्थसंकल्पिय भाषणाच्या वेळी राज्यातील मतदारांनी आक्टोंबर २००४ मध्ये होणाऱ्या निवडणूकीत जागरुक राहून मतदान करावे असे मी आवाहन केले होते. मतदारांनी हे आवाहन लक्षात ठेवून अत्यंत चाणाक्षपणे आमच्या शासनास पुन्हा सत्तेवर आणले. जबाबदार व विकासात्मक आर्थिक धोरणांचा अवलंब करुन या ऋणाची परतफेड करण्याची हीच वेळ आहे. महसुली आधिक्यामुळे आणि राज्यकोषिय तूट कमी झाल्याने महाराष्ट्राने आपल्या अर्थव्यवस्थेच्या आणि जनतेच्या पाठिंब्याच्या बळावर पुनर्रचनेची सुरवात केली आहे. आपल्या लोकाभिमुख धोरणांच्या

बळावर आमचे लोकशाही आघाडी शासन प्रदीर्घ काळ महाराष्ट्राच्या जनतेची सेवा करीत राहील असा मला विश्वास वाटतो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**